# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१७८ दिनांक - ०८/०५/२०२४

## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन एकुण २५,०८,७९६/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक २३/१२/२०२३ रोजी फिर्यादी श्री मनोज मोहन कामत, वय ५६ वर्षे, रा.आगाशी क्रॉसनाका, विरार पश्चिम यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, दिनांक ०७/१२/२०२३ रोजी ०२.०० वा.पासुन ते ०२.३३ वा.चे दरम्यान नालासोपारा पश्चिम, श्रीप्रस्था झिरो रोड, लोटस अपार्टमेंट, शॉप नंबर २ येथे फिर्यादी यांचे जिमखाना वाईन शॉप दुकानाचे उत्तरेकडील बाजूचे शटरचे डावे बाजूची कडी व सेंटर लॉक त्याचेकडील हत्याराने तोडून दुकानात प्रवेश करुन दुकानातील काऊंटर मधील व ऑफीसचे तिजोरीतील सोने, हिरे, माणिक मोती व रोख रक्कम असे एकुण रक्कम रुपये ५६,६५,०००/- चा ऐवज चोरी करुन नेला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ५७३/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८०, ४११ प्रमाणे अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये घडलेल्या सदर गुन्हयाचे व परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता सदरचा गुन्हा आरोपीत रामनिवास मंजु गुप्ता, रा.खडेगोलवली, कल्याण पूर्व याने केला असल्याची माहीती मिळाली. सदर आरोपीताचा त्याचे घरी जाऊन शोध घेतला असता, तो घरी मिळून आला नाही.

आरोपीत याने फोन वापरणे बंद करुन तो त्याचे राहणेचे ठिकाण बदलून दुस-या ठिकाणी राहण्यास होता व तो चोरी करण्यासाठी वेगवेगळया राज्यात, जिल्हयात फिरत असतांना त्यास जे.पी.रोड पोलीस ठाणे, वडोदरा, राज्य गुजरात यांनी पकडले. आरोपीत याने गुन्हयाची कबूली देऊन गुन्हयातील मालमत्ता दाखविण्यासाठी पोलीसांना ठाणे येथे घेऊन आला असतांना पोलीसांची नजर चुकवून तो पळून गेला होता. सदरबाबत ठाणे नगर पोलीस ठाणे गुरनं I ४०६/२०२४, भादंविसंक २२४ प्रमाणे दाखल आहे. सदर गुन्हयात आरोपीत याचा शोध घेऊन त्यास अटक करण्यात आली होती.

सदर आरोपीत याचा नमुद गुन्हयात ताबा घेऊन त्याचेकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासात गुन्हयात एकूण ४९६.२५ ग्रॅम वजनाचे २५,०८,७९६/- किंमतीचे सोन्याचे दागिने, लगड हस्तगत करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, विजय लगारे, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/राजेंद्र चंदनकर, पो.उपनिरी./योगेश मोरे, पो.उपनिरी./अख्तर शेख, सफौ/९५०३६ हिरालाल निकुंभ, पोहवा/०३०६२ किशोर धनु, पोहवा/०४००७ प्रशांत साळुंके, पोना/०३०६३ अमोल तटकरे, पोशि/१६०५२ कल्याण बाचकर, पोशि/१६०६५ राजेश नाटुलकर, पोशि/१७००६ प्रेम घोडेराव, सपोनि/पंडीत मस्के, सध्या नेम.वालीव पो.स्टे, सपोनि/अमोल तळेकर, सध्या नेम.नवघर पो.स्टे, तसेच पोलीस उप आयुक्त कार्यालय, परीमंडळ ३, विरार कार्यालयातील पोहवा/१२००१ नामदेव ढोणे, पोशि/२२०३० सोहेल शेख यांनी केलेली आहे.